लोकमत

# किरणोत्सव सोहळा उद्यापासून

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : करवीरनिवासिनी अंबाबाई देवीच्या किरणोत्सवास उद्या, शुक्रवारपासून सुरुवात होत आहे. आज, गुरुवारी सायंकाळी पाच ते सहा वाजण्याच्या दरम्यान आकाश निरीक्षणासाठी वापरल्या जाणाऱ्या मोठ्या दुर्बिणीद्वारे किरण मार्गातील अडथळ्यांची तपासणी होणार आहे.

वर्षातून दोन वेळा होणाऱ्या अंबाबाई देवीच्या किरणोत्सव मार्गात मानवनिर्मित अडथळे मोठ्या प्रमाणात आहेत; ते दूर करण्यासाठी देवस्थान समिती प्रयत्नशील आहे, तर अभ्यासक प्रा. मिलिंद कारंजकर हेही आपल्या अभ्यासक विद्यार्थ्यांसह देवीच्या मूर्तीपर्यंत तीव्र क्षमतेची किरणे विनाअडथळा कशी पोहोचतील यांचा अभ्यास करुन यासाठी उपाययोजना सुचवीत आहेत. त्यानुसार बुधवारी प्रा. कारंजकर यांच्या अभ्यासपथकाने सायंकाळी पाच वाजल्यापासून किरणांचा अभ्यास केला. या ठिकाणी नियमित वातावरणात किरणे १६० लक्स इतक्या तीव्र क्षमतेची लागतात; मात्र बुधवारी सायंकाळी ढगाळ वातावरणानंतर ९९ लक्स इतकी किरणांची तीव्रता मिळाली; त्यामुळे आज, गुरुवारी किरणांची तीव्रता वाढेल, असा अंदाज अभ्यासकांनी व्यक्त केला. दरम्यान किरणोत्सवाचा सोहळा विनाअडथळा पाहण्यासाठी मोठ्या स्क्रीनची व्यवस्था केल्याची माहिती देवस्थानचे सचिव विजय पोवार यांनी दिली.

सकाळ

# मंदिरात आजपासून किरणोत्सव

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. ७ : येथील श्री अंबाबाई मंदिरात उद्या (ता. आठ) पासून किरणोत्सवाला प्रारंभ होणार आहे. देवस्थानने जाहीर केल्यानुसार सलग पाच दिवस हा सोहळा होईल. सोहळ्यात रोज सायंकाळी मावळतीच्या सूर्यकिरणांचा अभिषेक देवीच्या मूर्तीवर होतो.**



## दूरचित्रवाणी मालिका

संत बाळूमामा, श्री गुरुदेव दत्त अशा मालिका सध्या दूरचित्रवाणीवर सुरू असून, येत्या काळात श्री अंबाबाई आणि श्री जोतिबाच्या माहात्म्यावर मालिकांची निर्मिती करण्याचा विचार असल्याचेही श्री. जाधव यांनी सांगितले.

दरम्यान, आज किरणोत्सव मार्गातील अडथळ्यांची टेलीस्कोपच्या साहाय्याने पाहणी झाली. त्यात काही घरांच्या गॅलरी, वायरचा अडथळा असल्याचे स्पष्ट झाले आहे. हे अडथळे काढून घेण्याच्या सूचना दिल्या असल्याचे समितीचे अध्यक्ष महेश जाधव यांनी सांगितले. नऊ, दहा आणि अकरा नोव्हेंबरला किरणोत्सव सोहळा भाविकांना मंदिराबाहेर पाहता यावा, यासाठी एलईडी स्क्रीन बसवले जाणार असल्याचेही ते म्हणाले.

विवेकानंद कॉलेजच्या टीमच्या वतीने कालपासून सूर्यकिरणांच्या तीव्रतेच्या पाहणीला प्रारंभ झाला आहे. या टीमने आजही मावळतीच्या सूर्यकिरणांची पाहणी केली. सायंकाळी सूर्यकिरणांनी देवीच्या गाभाऱ्यापर्यंत प्रवेश केला. सूर्यकिरणांची तीव्रता प्रखर असून, किरणोत्सव सोहळा पूर्ण क्षमतेने होईल, असे प्रा. मिलिंद कारंजकर यांनी सांगितले.

लोकमत

# अंबाबाई किरणोत्सव आजपासून

## चाचणीत किरणांची तीव्रता पोषक : १५ कि.मी.अंतरापर्यंतच्या अडथळ्यांची दुर्बिणीतून पाहणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** करवीरनिवासिनी अंबाबाई देवीचा किरणोत्सव आज, शुक्रवारपासून सुरु होत आहे. या पार्श्वभूमीवर अभ्यासकांनी गुरुवारी सायंकाळी केलेल्या चाचणीत किरणांची तीव्रता किरणोत्सवास पोषक असल्याचे दिसून आले. सोबतच दुर्बिणीद्वारे १५ कि.मी. अंतरापर्यंतच्या अडथळ्यांचीही पाहणी करण्यात आली.

अंबाबाई देवीचा वर्षातील पहिला किरणोत्सव ९, १० आणि ११ नोव्हेंबरदरम्यान सुरु होतो. मात्र, तत्पूर्वी अभ्यासकांनी केलेल्या मागणीनुसार सुरुवातीच्या दिवसाअगोदरचा एक दिवस आणि शेवटच्या दिवसानंतरचा एक दिवस असे पाच दिवस किरणोत्सव अभ्यासण्यासाठी मागील वर्षापासून सुरुवात झाली. त्यानुसार यंदाही पाच दिवसांच्या किरणोत्सवास आज, शुक्रवारपासून सुरुवात होणार आहे. या पार्श्वभूमीवर पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीचे अध्यक्ष महेश जाधव व किरणोत्सव अभ्यासक प्रा. मिलिंद कारंजकर यांच्या विद्यार्थी अभ्यासकांनी गुरुवारी सायंकाळी किरणांची तीव्रता मोजली. यात पाच वाजून ४७ मिनिटांनी महाद्वार दरवाजात ३७ हजार लक्स इतकी किरणांची तीव्रता मिळाली. किरणांनी गर्भकुटीत प्रवेश केल्यानंतर पहिल्या संगमरवरी पायरीवरुन कटांजलीच्या डावीकडे झुकत किरणे लुप्त झाली. त्यामुळे आजपासून वातावरण स्वच्छ राहिल्यास किरणोत्सवास सुरुवात होईल. यासोबतच आकाशनिरीक्षण दुर्बिणीतून पाहणी केल्यानंतर १५ कि.मी.पर्यंतच्या अडथळ्यांची पाहणी केली. यात लोखंडी ग्रिल, वायर, आदींचे अडथळे निर्माण झाले आहेत. त्यांची पाहणी करण्यात आली. या दरम्यान, उपस्थित असलेले देवस्थान समितीचे अध्यक्ष महेश जाधव यांनाही ते दाखविण्यात आले. त्यांनीही अभ्यासकांना अडथळे दूर करण्याचे आश्वासन दिले. हे अडथळे दूर झाल्यास किरणांची तीव्रताही मोठ्या प्रमाणात मिळेल व किरणोत्सव पूर्ण होण्यास मदत होईल.

> देवस्थानतर्फे भाविकांना किरणोत्सवाचा सोहळा 'याची देही, याची डोळा' पाहता येण्यासाठी मंदिर परिसरात ९, १०, ११ तारखांना मोठ्या स्क्रीनची व्यवस्था केली जाईल. सोबतच किरणोत्सव मार्गातील अडथळेही दूर केले जातील.
>
> **- महेश जाधव, अध्यक्ष, पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समिती**



सकाळ

# अंबाबाई मंदिरात उद्यापासून किरणोत्सव

कोल्हापूर, ता. ६ : श्री अंबाबाई मंदिरातील किरणोत्सवाला शुक्रवार (ता. ८) पासून प्रारंभ होणार आहे. या पार्श्वभूमीवर आजपासून मावळतीच्या सूर्यकिरणांच्या पाहणीला प्रारंभ झाला. सायंकाळी पाच वाजून ३५ मिनिटांनी ढग सूर्यकिरणांच्या आडवे आले; मात्र पुढे दोनच मिनिटांनी ढग बाजूला गेल्याने चांदीच्या उंबऱ्यापर्यंत सूर्यकिरणे पोचली. सूर्यकिरणांची तीव्रताही चांगली असल्याचे प्रा. मिलिंद कारंजकर यांनी सांगितले.



मंदिरात परंपरेप्रमाणे नऊ, दहा आणि अकरा नोव्हेंबरला किरणोत्सव होतो; मात्र गेल्या वर्षीपासून पाच दिवसांचा किरणोत्सव देवस्थान समितीने जाहीर केला आहे. त्यानुसार हा किरणोत्सवही पाच दिवसांचा होणार आहे.

Kolhapur, Main
07/11/2019 Page No. 5